F/C

महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९१४८६
ई-मेल - desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

तात्काळ :: स्पीड पोस्ट / ई-मेलद्वारे

क्रमांक :- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१/ 290
दिनांक :- 02 / ०७ /२०२१

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता डीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या कार्यवाहीबाबत ....... (मुदतवाढ)

संदर्भ : १. या कार्यालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/२०२०/३७७,दि.०३/१२/२०२०
२. या कार्यालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/विकाप/२०२१/१३,दि.१३/०१/२०२१
३. या कार्यालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/विकाप/२०२१/४६,दि.११/०२/२०२१
४. या कार्यालयामार्फत डीबीटी पोर्टलवरील योजनांबाबत घेतलेली V.C. बैठक,दि.१२/०२/२०२१
५. या कार्यालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/व्ही.सी./२०२१/५९,दि.२४/०२/२०२१
६. या कार्यालयाचे अ.शा.पत्र. क्रमांक.१८/तंशिसं/डीबीटी/२०२१/६४, दि.०१/०३/२०२१
७. सामान्य प्रशासन विभाग (मा.तं.)यांचे पत्र क्र.डीबीटी २०१८/प्र.क्र.४७/से-१/३९ दि.०१/०३/२०२१
८. या कार्यालयाचे अ.शा.पत्र. क्रमांक.१८/तंशिसं/डीबीटी/२०२१/७८, दि.०४/०३/२०२१
९. या कार्यालयाचे पत्र. क्रमांक.१८/तंशिसं/डीबीटी/२०२१/९६, दि.१५/०३/२०२१
१०. या कार्यालयाचे पत्र. क्रमांक.१८/तंशिसं/डीबीटी/२०२१/१०४, दि.१७/०३/२०२१
११. या कार्यालयाचे पत्र. क्रमांक.१८/तंशिसं/डीबीटी/२०२१/१४३, दि.०६/०४/२०२१
१२. या कार्यालयाचे पत्र. क्रमांक.१८/तंशिसं/डीबीटी/२०२१/१५४, दि.१९/०४/२०२१
१३. या कार्यालयाचे पत्र. क्रमांक.१८/तंशिसं/डीबीटी/२०२१/१६०, दि.०३/०५/२०२१
१४. या कार्यालयाचे पत्र. क्रमांक.१८/तंशिसं/डीबीटी/२०२१/१७९, दि.०१/०६/२०२१

उपरोक्त १ ते ६ व ९ ते १४ च्या संदर्भीय पत्रान्वये, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता महाडीबीटी पोर्टलवर तंत्रशिक्षण संचालनालयाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत सर्व विभागीय कार्यालयांमार्फत त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांना, डीबीटी पोर्टलवरील योजनांच्या लाभासाठी त्वरीत, पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज भरुन घेण्याबाबत तसेच संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये व विभागीय कार्यालयांनी त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त होणारे योजनांचे अर्ज प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या अटी व शर्तीनुसार तपासणी (मंजूर / नामंजूर) करुन तातडीने निकाली काढण्याबाबत वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे.

डीबीटी पोर्टलवरील सोबत जोडलेल्या स्क्रीन शॉटनुसार, सन २०२०-२१ करिता विद्यार्थ्यांना अर्ज भरुन अंतिम करण्यासाठी दि.१५/०७/२०२१ पर्यंत मुदतवाढ जाहिर करण्यात आलेली आहे.

सर्व विभागीय कार्यालयांनी त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांना सूचित करावे की, डीबीटी पोर्टलवर सन २०२०-२१ करिता, तंत्रशिक्षण संचालनालयाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या लाभासाठी ज्या पात्र विद्यार्थ्यांने अंर्ज भरलेला नाही अशा पात्र विद्यार्थ्यांकडून दिलेल्या वाढीव मुदतीत अर्ज भरुन घ्यावेत. जर पात्र विद्यार्थी योजनेचा अर्ज भरण्यापासून वंचित राहिल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी. तसेच,

सोबत जोडलेल्या दि. ०१/०७/२०२१ रोजीच्या डीबीटी डॅशबोर्डनुसार आज रोजी प्रलंबित अर्जांची स्थिती खालीलप्रमाणे असून संबंधित संस्था व संबंधित विभागीय कार्यालयाच्या लॉगीनमध्ये देखील उपलब्ध आहे. तरी संबंधित विभागीय कार्यालयांनी त्यांच्या अखत्यारित येणाऱ्या संबंधित संस्थांना प्रलंबित अर्जांबाबत खालीलप्रमाणे सूचित करुन अर्ज निकाली काढावेत.

| अ.क्र. | डीबीटी डॅशबोर्ड रिपोर्ट तपशील | विद्यार्थी अर्ज संख्या | संस्था / विभागीय कार्यालय यांनी करावयाची कार्यवाही |
|---|---|---|---|
| १. | संस्था स्तरांवर तपासणीसाठी प्रलंबित अर्ज | ७,७४४ | संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये अर्ज तपासणीसाठी प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनसुार तपासणी (मंजूर / नामंजूर ) करुन निकाली काढावेत. तसेच जर विद्यार्थी संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनसुार पात्र नसेल तर अर्ज Sent Back न करता संस्था स्तरांवरुन नामंजूर करावे. |
| २. | संस्थांनी विद्यार्थ्यांना परत पाठविलेले अर्ज (Sent back अंतर्गत असलेले अर्ज) | १७,१८९ | संस्थांनी विद्यार्थ्यांना अर्जाची त्रुटी दूर करण्याबाबत कळवून अर्ज भरुन घेऊन अंतिम मुदतीच्या आत निकाली काढण्यात यावे. |
| ३. | विभागीय कार्यालय स्तरांवर तपासणीकरिता प्रलंबित अर्ज | ४,४३१ | संबंधित विभागीय कार्यालयांनी त्यांच्या लॉगीनमध्ये अर्ज तपासणीसाठी प्रलंबित न ठेवता, संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार तपासणी (मंजूर / नामंजूर)करुन निकाली काढावेत. |

तसेच डीबीटी पोर्टलवर सन २०१९-२० करितादेखील, विद्यार्थ्यांकडून पुनःश्च अर्ज (Re-Apply) भरुन घेण्यासाठी व अर्ज तपासणीची, दि.१५/०७/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे याबाबत सर्व विभागीय कार्यालयांनी नोंद घ्यावी व याबाबत संस्थांमार्फत सर्व पात्र विद्यार्थ्यांना सूचित करण्याबाबत कळविण्यात यावे जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही.

(डॉ. अभय वाघ. )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

प्रत :: यांना माहितीसाठी सविनय सादर.

१) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२

२) मा. अपर मुख्य सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय विस्तार भवन, ७ वा मजला, मुंबई-३२
(लक्षवेध : श्री. सं. बा. जाधव, कक्ष अधिकारी)

पृष्ठांकन पत्र जा.क्र.विकाऔ/शिक्षण/2021/1812 — दिनांक :- 5 JUL 2021

प्रति,

प्राचार्य, सर्व शासकीय अनुदानित/विनाअनुदानित पदवीका/पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायीक अभ्यासक्रमांच्या संस्था, औरंगाबाद विभाग यांना कळविण्यात येते की, वरील विषयी संदर्भिय पत्राचे अवलोकन करून शैक्षणिक वर्ष 2020-21 करिता डीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या योजनांच्या कार्यवाहीबाबत दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबतची नोंद घ्यावी.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद